09 JAN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक धोरणाकडे सकारात्मकतेने पाहा

## कुलगुरू डॉ. शिर्के : 'शिवाजी विद्यापीठ-रवळनाथ'तर्फे सांगलीत चर्चासत्र

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : 'उच्चशिक्षणाच्या प्रवाहात देशातील युवकांचा ओढा फारसा चांगला नाही. यामुळे रचनात्मक बदल स्वीकारून नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविले जात आहे. या धोरणाची प्रभावी अमलबजावणी होण्यासाठी शिक्षकांनी सकारात्मकतेने या धोरणाकडे पाहावे,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले.

येथील मधुबाई गरवारे कन्या महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ व श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे झालेल्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' या विषयावरील जिल्हास्तरीय चर्चासत्रात ते बोलत होते. वुमेन्स एज्युकेशन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. लता देशपांडे अध्यक्षस्थानी होत्या. शैक्षणिक धोरण सुकाणू समितीचे शासकीय सदस्य डॉ. माधव वेलिंग यांची प्रमुख उपस्थिती होती.



सांगली : चर्चासत्रात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. माधव वेलिंग, डॉ. लता देशपांडे, एम. एल. चौगुले, डॉ. भास्कर ताम्हणकर, डॉ. आर. जी. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

डॉ. वेलिंग म्हणाले, 'नव्या शैक्षणिक धोरणाला सामोरे जाताना त्यातील मल्टिपल एंट्री, एक्झिट व क्रेडिट सिस्टीम याचा अभ्यास शिक्षकांनी करावा. शिक्षकांनी संशोधनातून ज्ञान आत्मसात केल्यास या धोरणाची अंमलबजावणी सहज होईल.'

डॉ. देशपांडे म्हणाल्या, 'शैक्षणिक बदलाबरोबरच नवी पिढी शिक्षणासह सुसंस्कारित कशी बनेल, याकडेही शिक्षक म्हणून जबाबदारीने कर्तव्य पार पाडण्याची गरज आहे.'

रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. अस्मिता केळकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संजय ठिगळे यांनी आभार मानले. चर्चासत्रात सांगली व कोल्हापुरातील १६५ प्राध्यापकांनी सहभाग घेतला. यावेळी डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. दत्ता पाटील, डॉ. किरण पोतदार, महेश मजती, सीईओ डी. के. मायदेव, प्राचार्य आर. जी. कुलकर्णी, रमेश चराटे, सतीश हेरवाडे, शाखाधिकारी श्रेयस गाडवे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JAN 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाबरोबर भूचुंबकत्व संस्थेच्या कराराचे नूतनीकरण

कोल्हापूर : विद्यापीठातील भौतिक शास्त्र अधिविभाग आणि मुंबईतील भारतीय भूचुंबकत्व संस्थेमध्ये सामंजस्य कराराचे नूतनीकरण करण्यात आले. यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे सहकार्य लाभले. संस्थेचे संचालक प्रा. डिमरी यांना विद्यापीठाला भेट देण्यासाठी निमंत्रण दिले. यावेळी प्रा. ए. पी. डिमरी, प्रा. एस. गुरुबरन, एपीसीचे अध्यक्ष प्रा. सत्यवीर सिंग, डॉ. गोपी सीमाला; कुलसचिव आशुतोष शुक्ला, डॉ. भारती काकड तर शिवाजी विद्यापीठाचे डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. आर. एस. व्हटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
09 JAN 2024 पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणसांच्या स्मृतींचे विस्थापन भयावह : खोत

कोल्हापूर : माणसांचे विस्थापन हा आजच्या जगण्यातला महत्त्वाचा प्रश्न आहेच, पण माणसाच्या स्मृतींचे जाणीवपूर्वक करण्यात येत असलेले विस्थापन भयावह आहे. हे रोखणे आजघडीला महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक कृष्णात खोत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातर्फे 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात खोत यांच्यासह 'रिंगाण' या पुरस्कारप्राप्त साहित्य कृतीच्या इंग्रजी अनुवादक डॉ. माया पंडित यांच्यासमवेत संवाद झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. मेघा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JAN 2024
पुढारी

# 'रिंगाण'मध्ये माणूस-निसर्ग संबंधांचे चित्रण

- शिवाजी विद्यापीठात परिसंवादाचे आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कृष्णात खोत यांनी 'रिंगाण' कादंबरीमध्ये माणूस आणि निसर्गामधील सहसंबंधांचे चित्रण केले आहे. हे सहसंबंध जोपासले नाही तर विनाश अटळ आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठाच्या परिसंवादामध्ये उमटला.

विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातर्फे रिंगाण कादंबरीवर विशेष परिसंवाद झाला. यात पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर, ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे, लेखक-अनुवादक डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी सहभाग घेतला. डॉ. तृप्ती करेकट्टी व डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JAN 2024
सकाळ

# व्यवस्थापन विकास कार्यक्रम १६ रोजी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे शिक्षणशास्त्र सभागृहात १६ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता व्यवस्थापन विकास कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात बिगर शासकीय संघटना, तिचे कार्य व स्वरूप, मिळणारे अर्थसहाय्य, विविध विकासात्मक प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीयस्तरावरील संस्था, अर्थसहाय्यासाठी प्रकल्प अहवाल कसा तयार करावा?, संस्थात्मक सभा व कार्यक्रमाचे अहवाल लेखन, संस्थेचे आर्थिक नियोजन व वार्षिक लेखापरीक्षण अहवाल याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती या केंद्राचे संचालक प्रा. एस. एस. महाजन यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JAN 2024
तरुण भारत

# विद्यापीठात उद्या प्लेसमेंट ड्राईव्ह

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाच्या वतीने रासायनिक अभियंत्यांसाठी १० जानेवारी रोजी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले आहे. एलिक्सिर कन्सल्टंट्स युके लिमिटेड यांच्यातील धोरणात्मक सहकार्याने रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. युके लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक विश्वास शिंदे यांचे मूळ गाव पन्हाळा तालुक्यातील बोरिवडे आहे. या ड्राईव्हसाठी प्लेसमेंट ड्राईव्हसाठी शिवाजी विद्यापीठ केंद्रीय प्लेसमेंट कक्षाकडून सहकार्य मिळाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठात उद्या प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

कोल्हापूर : एलिक्सिर कन्सल्टंटस् यूके, शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या वतीने पदवीधर बॅच व माजी विद्यार्थ्यांसाठी १० जानेवारी रोजी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठातील रासायनिक अभियांत्रिकी विभाग व एलिक्सिर कन्सल्टंटस् यूके यांच्यातील धोरणात्मक सहकार्याने संधीचा मार्ग मोकळा झाला आहे. शैक्षणिक व उद्योग यांच्यातील दरी कमी करण्यासाठी याचा उपयोग होणार आहे. विद्यापीठ केंद्रीय प्लेसमेंट कक्ष, तंत्रज्ञान अधिविभागातील प्लेसमेंट कक्ष परिश्रम घेत आहे.

0 9 JAN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेलो इंडियाला शिवाजी विद्यापीठ पात्र

## बरद्वान विद्यापीठ फुटबॉल संघावर तीन गोलने मिळविला विजय

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : येथील शिवाजी विद्यापीठ संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत बरद्वान विद्यापीठ संघावर मात केली. या विजयासह खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघाची निवड झाली.

जालंधर (पंजाब) येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने पश्चिम बंगालच्या बरद्वान विद्यापीठावर तीन विरुद्ध दोन गोल फरकाने विजय मिळवला. या विजयासह प्रथम आठ संघांत स्थान मिळवत फेब्रुवारीमध्ये चेन्नई येथे होणाऱ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेतील सहभागी शिवाजी विद्यापीठ संघासह प्रशिक्षक प्रा. डॉ. अभिजित वणिरे व सहायक प्रशिक्षक अमर सासणे.

आज झालेल्या सामन्यात बरद्वान विद्यापीठाच्या संघाने आक्रमक खेळ केला. सुरुवातीला दोन गोलने आघाडी घेत शिवाजी विद्यापीठ संघावर दबाव आणला. मात्र; शिवाजी विद्यापीठ संघाने आक्रमक चाली रचत पूर्वार्धाच्या अखेरीस सामना दोन गोल बरोबरीत आणला. यामध्ये आदित्य कल्लोळीने मैदानी गोल व प्रथमेश हेरेकरने मिळालेल्या फ्री किकवर गोल नोंदवला. उत्तरार्धात प्रभू पोवार, प्रथमेश हेरेकर, संकेत मेढे, आदित्य कल्लोळी, सिध्देश साळोखे, यश कांवळे यांनी आक्रमक चाली रचल्या. यात आदित्य कल्लोळीने वैयक्तिक दुसरा तर संघासाठी तिसऱ्या गोलची नोंद केली. आघाडी घेऊन शिवाजी विद्यापीठ संघाने बरद्वान विद्यापीठावर दबाव वाढवला. यात शिवाजी विद्यापीठाची भक्कम बचावफळीने मोलाचे काम केले. त्यांना गोलरक्षक अनिल जानकर याची साथ मिळाल्याने 'बरद्वान'च्या संघाला गोल नोंदवणे शक्य झाले नाही. या विजयासह शिवाजी विद्यापीठ संघाने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

09 JAN 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघाची आगेकूच

## अ. भा. आंतरविद्यापीठ स्पर्धा : उपउपांत्यपूर्व सामन्यात प. बंगालच्या बरद्वान विद्यापीठाचा ३-२ ने केला पराभव



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेतही शानदार खेळ करत राष्ट्रीय खेलो इंडिया फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या शिवाजी विद्यापीठ संघासोबत प्रा. डॉ. अभिजीत वणिरे व प्रा. डॉ. शिवराज गायकवाड.

प्रतिनिधी
कोल्हापूर

मुंबईत झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत उपविजेतेपद मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठ संघाने जालंधर (पंजाब) येथे सुरु असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेतही शानदार खेळ करत राष्ट्रीय खेलो इंडिया फुटबॉल स्पर्धेचे तिकीट काढले आहे. चेन्नई (तामिळनाडू) येथे लवकरच खेलो इंडिया स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे.

दरम्यान, अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेतील सोमवारी झालेल्या उपउपांत्यपूर्व सामन्यांत शिवाजी विद्यापीठ संघाने पश्चिम बंगालच्या बलाढ्य बरद्वान विद्यापीठाचा ३-२ गोलफरकाने पराभव करुन स्पर्धेच्या पहिल्या आठ विद्यापीठीय संघांच्या यादीत स्थान मिळवले. सामन्याच्या पुर्वार्धातील सुरवातीलाच बरद्वान विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ संघावर २ गोल करुन भक्कम आघाडी घेतली होती. शिवाजी विद्यापीठ संघाला पराभवाच्या इशाराही दिला होता. मात्र शिवाजी विद्यापीठ संघाने हिंमत न हारता पूर्वार्ध संपेपर्यंत तुल्यबळ खेळ करत बरद्वान विद्यापीठावर २ गोल केल्या. यापैकी पहिला गोल आदित्य कल्लोळीने व तर दुसरा गोल प्रथमेश हेरेकरने मिळालेल्या फ्री-किकमधून नोंदवला. त्यामुळे सामना २-२ असा गोलबरोबरीत होऊन चुरशीच्या वळणावर येऊन ठेपला. सामन्याच्या उत्तरार्धात प्रभू पोवार, प्रथमेश, संकेत मेढे, आदित्य, सिद्धेश साळोखे व यश कांबळे यांनी बरद्वान विद्यापीठावर आक्रमक चालींचा मारा केला. या माऱ्यातूनच ६५ व्या मिनिटाला झालेल्या एका अप्रतिम चालीतून आदित्यने बरद्वान विद्यापीठाच्या गोलजाळ्यात चेंडू मार शिवाजी विद्यापीठ संघाला ३-२ गोलफरकाची बढत मिळवून दिली. यानंतर सामना संपेपर्यंत शिवाजी विद्यापीठ संघाच्या अभेध्य बचावफळीने टिमवर्क दाखवून देत बरद्वान विद्यापीठाच्या खेळाडूंना गोल करण्याची संधीच दिली नाही. याच कामगिरीमुळे शिवाजी विद्यापीठ संघाचा बरद्वान विद्यापीठ संघावर ३-२ गोलफरकाने विजय होऊन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश झाला आहे. येत्या १० जानेवारीला शिवाजी विद्यापीठ संघाचा उपांत्यपूर्व सामना आहे.

**खेलो इंडियासाठी पात्र झालेला शिवाजी विद्यापीठचा संघ :** कर्णधार प्रथमेश हेरेकर, स्वयंम साळोखे, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, तेजस शेळके, प्रभू पोवार, संकेत जरग, आदित्य कल्लोळी, देवराज मंडलिक, अविष्कार राऊत, अनिल जानकर, संकेत मेढे, निरंजन कामते सिद्धेश साळोखे.